# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 15/06/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

क्र :-पोअय/प्रलि/८०-सी/तात्पुरता कार्यभार-पो.स्टे.पुसद शहर/पो.नि.फाडे/4688/२०२० यवतमाळ दिनांक 15 JUN 2020

## आदेश

प्रभारी अधिकारी पोनि/प्रथमेश आत्रम, पो.स्टे. पुसद शहर हे, दि.०८.०६.२०२० रोजी पासून त्यांचे स्वतःचे आजारामुळे औषधोपचार कामी सिक रजेवर रवाना झालेले असल्याने, तसेच सद्यस्थितीत कोरोना या आजारामुळे पुसद शहर येथे बदोबस्त सदृष्य परिस्थिती सुरू असल्यामुळे व पुसद शहर हे संवेदनशिल व कायदा व सुव्यवस्था च्या दृष्टीकोणातुन महत्वाचे असल्याने पोलीस स्टेशन पुसद शहर येथे **पोलीस निरीक्षक पांडूरंग विठठल फाडे, पोलीस कल्याण शाखा, यवतमाळ हे स्वतःचे कामकाज सांभाळुन पुढील आदेशापर्यंत पोलीस स्टेशन पुसद शहर चे प्रभारी अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरूपात कामकाज पाहतील.**

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,**
पोलीस निरीक्षक पांडूरंग विठठल फाडे, पोलीस कल्याण शाखा, यवतमाळ

**प्रत,**
अ.पो.अ./पोउपअधी(मु)/उविपोअ-पुसद/पो.स्टे.पुसद शहर/नियंत्रणकक्ष/पोलीस कल्याण शाखा/ लघुलेखक/ वेतन लिपीक-२/ प्रवास भत्ता लिपीक /भ.नि.नि.लिपीक / वि.चौ.लिपीक / संगणक कक्ष/डिपीजी लिपिक.

# भाग २ - रजा

क्रमांक :डीपी/३१-बी २/हजर/ पोहवा/२३६ राजेंद्र साबळे / 4638 /२०२० यवतमाळ दिनांक 15 JUN 2020

## आ दे श

पोहवा/२३६ राजेंद्र साबळे ,नेमणुक पो.मु.यवतमाळ हे दि.२२/४/२०२० ते १४/६/२०२० पावेतो एकुण ५४ दिवस वरीष्ठांना कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावर अनधिकृत गैरहजर असल्याने यांनी सादर केलेल्या विनंती अर्ज व आज्ञांकीत कक्षात केलेल्या विनंती नुसार आज दि. १५/६/२०२० रोजी यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे.

**तसेच दि.२२/४/२०२० ते १४/६/२०२० पावेतोचा एकुण ५४ दिवस गैरहजर कालावधी हा " अर्जित रजा " मंजुर करण्यात येत आहे.**

(मा.पो.अ.यांचे आदेशान्वये)

15-6

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
पो.अ.कार्या.यवतमाळ

प्रति,

राखीव पोलीस मुख्यालय,यवतमाळ

प्रत - आस्था. लि./सहा.आस्था लिपीक-१/डिपीजी लिपीक/पोहवा- २३६ राजेंद्र साबळे - पो.मु.यवतमाळ यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक :पोअय/वि.चौ/पो.उप.नि-गोपाळचावडीकर /अं.आ/नस्तिबध्द/ 4660 /२०१९ यवतमाळ दि:- 15 JUN 2020

<u>अंतिम आदेश</u>

पो.उप.नि/निलेश गोपाळचावडीकर, हे पोलीस अधीक्षक, सोलापुर ग्रामिण यांचे आस्थापनेवर नेमणुकीस असतांना, पोलीस अधीक्षक, सोलापुर ग्रामिण यांनी ५०००/- रु. आर्थीक दंडाची शिक्षा प्रस्तावित केली आहे. सदर पो.उप.नि/गोपाळचावडीकर, यांना दिनांक १०/०६/२०२० रोजी आज्ञांकित कक्षात मौखिक म्हणने मांडण्याकरीता बोलविण्यात आले असता, त्यांनी दिलेले स्पष्टिकरण संयुक्तीक वाटल्याने, प्रकरण **(file )*नस्तिबध्द*** करण्यात येत आहे.

| अ.क्र | पो.अधि/कर्म नाव | पो.स्टे | संदर्भ | प्रस्तावित शिक्षा |
|---|---|---|---|---|
| ०१. | पो.उप.नि/निलेश गोपाळचावडीकर | पुसद ग्रामिण | विचौ/कसूरी/गोपाळचावडीकर/२०१९-२४०७ सोलापुर ग्रामीण दिनांक २८/०५/२०१९ | ५०००रु. आर्थीक दंड |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ.

प्रति,

पो.उप.नि/निलेश गोपाळचावडीकर, नेमणुक पो.स्टे. पुसद ग्रामिण.

मार्फत :- ठाणेदार पो.स्टे. पुसद ग्रामीण

प्रत :- डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव

प्रत सस्नेह अग्रेषीत :- पोलीस अधीक्षक, सोलापुर ग्रामीण.

क्रमांक :पोअय/वि.चौ/पो.उप.नि-राठोड /अं.आ/नस्तिबध्द/ 4662 /२०१९ यवतमाळ दि:- 15 JUN 2020

## अंतिम आदेश

खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी कारणे दाखवा नोटीसचे सादर केलेले स्पष्टिकरण संयुक्तीक वाटल्याने, प्रकरण **(file )*नस्तिबध्द*** करण्यात येत आहे.

| अ.क्र | पो.अधि/कर्म नाव | पो.स्टे | संदर्भ | प्रस्तावित शिक्षा |
|---|---|---|---|---|
| ०१. | पो.उप.नि/अमोल राठोड | नियंत्रक कक्ष यवतमाळ | डीपी/३१-२/पो.उप.नि. -राठोड/कसुरी/३७३४/२०२० यवतमाळ दिनांक १३/०५/२०२० | २००० रु. आर्थीक दंड |

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ .

प्रति,

पो.उप.नि/अमोल राठोड, नेमणुक नियंत्रण कक्ष, यवतमाळ

मार्फत :- प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष यवतमाळ

प्रत :- डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव

क्र :पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/पोहवा-१६११ गजानन पिसे/ 4676 /२०२० यवतमाळ दि. 15 JUN 2020

## अंतिम आदेश

**अपचा-यांचे नांव :-** पोहवा-१६११ गजानन पिसे, नेमणुक पो.स्टे.यवतमाळ शहर, सध्या पो.मुख्या. यवतमाळ.

**दोषारोप :-**

**१)** आपण पोहवा/१६११ गजानन पिसे, पो.स्टे यवतमाळ शहर येथे नेमणुकीस असतानां व शासकीय रुग्णालय बिटमध्ये कार्यरत असता पो.स्टे.यवतमाळ शहर येथे अपराध क्र.५११/२०१९ कलम ४९८ (अ), ३४ भा.द.वि. गुन्हयाचा तपास आपणाकडे देण्यात आला होता. आपण सदर गुन्हयाचे तपासात फिर्यादीकडुन सहकार्य करण्यासाठी लाचेची मागणी करुन पडताळणी कार्यवाही दरम्यान फिर्यादि यांचे सोबत घरापर्यत जावुन रक्कम स्विकारण्याचे मान्य केले परंतु संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. सदर बाब लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे पडताळणी दरम्यान दिसुन आल्याने फिर्यादी यांनी आपल्या विरुध्द पो.स्टे यवतमाळ शहर येथे गंभीर स्वरुपाचा लाचलुचपत अंतर्गत दखलपात्र गुन्हा अप क्र.०५८२/२०१९ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये दि.०४/१०/२०१९ रोजी नोंद करण्यात आला. अशा प्रकारे आपण स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेण्यासाठी लोकसेवक वर्ग-३ या पदाचा दुरुपयोग करुन पोलीस खात्याची प्रतिमा जनमानसात मलीन करून गंभीर कसूरी केलेली आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/विचौ/पोहवा-१६११ पिसे/१३०४१/२०१९, दिनांक १९/११/२०१९ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर विभागीय चौकशीत आपण स्वतःचा आर्थिक लाभ करुन घेण्यासाठी लोकसेवक वर्ग-३ या पदाचा दुरुपयोग करुन पोलीस खात्याची प्रतिमा जनमानसात मलीन केल्याचे सिध्द झाले आहे. पोलीस खात्यात असता आपण केलेल्या गैरवर्तना बाबत आपणास मुबंई पोलीस (शिक्षा आणी अपीले ) नियम १९५६ मधिल नियम ३ (१) (१) चे तरतुदीनुसार "सध्याच्या पदावरुन ०२ वर्षाकरीता पदावनत" ही शिक्षा का देण्यात येवू नये ? म्हणुन तसेच निलंबन कालावधी दि. ०५/१०/२०१९ ते १३/१२/२०१९ पर्यंतचा निलंबन कालावधी जसाचे तसा (As Such) का करण्यात येवु नये ? म्हणुन कादानो देण्यात आली. सदरची कादानो दि.२१/०५/२०२० रोजी स्विकारुन त्यावर दि. ०१/०६/२०२० रोजी स्पष्टिकरण सादर केले आहे. अंतिम आदेश निर्गमित करण्या पुर्वी अपचारी यांना त्यांचे मौखिक म्हणने मांडण्याकरीता दि. ११/०६/२०२० रोजी आज्ञांकित कक्षात बोलविण्यात आले असता मौखिक म्हणने ऐकुण घेण्यात आले. स्पष्टिकरण व मौखिक म्हणने समाधानकारक नसल्याने खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे, अपचारी पोहवा/१६११ गजानन पिसे, यांना उपरोक्त कसूरी प्रकरणी **मुबंई पोलीस (शिक्षा आणि अपीले ) नियम १९५६ मधिल नियम ३ (१) (१) चे तरतुदीनुसार "सध्याच्या पदावरुन ०२ वर्षाकरीता पदावनत" ही शिक्षा देण्यात येत आहे. तसेच निलंबन कालावधी दि. ०५/१०/२०१९ ते १३/१२/२०१९ पावेतोचा जसाचे तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

**( एम.राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ.**

**प्रतीः-** **पोहवा/१६११ गजानन पिसे,** नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.
**मार्फत :-** राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.
२/- सोबत अंतिम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी
**प्रत :-** पोउपअधि(मुख्या)/ठाणेदार, पो.स्टे. यवतमाळ शहर/आस्थापना लिपीक (कर्मचारी ) /सआली-०३/वेतन लिपीक-०१ डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस्तव.

क्र.पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ./सपोउपनि-१४३८ सुधाकर जाधव/ 4683 /२०२० यवतमाळ दि. 15 JUN 2020

## अंतिम आदेश

**अपचा-याचे नांव** :- सपोउपनि/१४३८ सुधाकर जाधव तात्का नेमणुक पो.स्टे.पांढरकवडा
सध्या नेमणुक पोलीस मुख्यालय यवतामळ

**दोषारोप :-**

आपण सपोउपनि/१४३८ सुधाकर जाधव पो.स्टे.पांढरकवडा येथे नेमणुकीस असुन आपणाकडे पांढरकवडा शहरातील वाहतुक नियमन करणे व अवैद्य प्रवासी वाहतुक करणारे दुचाकी,चारचाकी वाहन चालक यांचेविरुध्द कायदेशिर कार्यवाही करणे करीता आपली ट्राफीक डयुटी नेमण्यात आली होती, वाहतुक नियमन डयुटी करणारे पो.स्टे.चे सर्व कर्मचारी यांना प्रभारी अधिकारी यांनी वारंवार गणनेत व ईतरही कामकाजाचे वेळेस सर्व सामान्य लोकांना पोलीसांकडुन त्रास होणार नाही, नेहमी कायदेशिर बाबीला अनुसरुन कार्यवाही करावी याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले ~~असुन~~ असुन सुध्दा आपण दि.१४/०२/२०२० रोजी घाटंजी कडुन रोडने पांढरकवडा कडे येणारी वाहने ही सिंचन विभाग पांढरकवडा जवळ थांबवुन वाहन चालकांना पैशाची मागणी करीत असल्याबाबतचा व्हीडीओ सोशल मिडीयावर (व्हॉस्ट ॲप) व्हायरल झाला. आपण दोन्ही कृझर वाहना विरुध्द कायदेशिर कार्यवाही करणे क्रमप्राप्त होते. परंतु आपण तसे न करता वाहन चालकाकडुन स्वत:चा आर्थीक लाभ करुन घेण्याकरीता पैसे मिळवे या उद्देशाने सार्वजनिक रित्या सदर लोकांशी पैश्यासंबधी बोलणे केल्याबाबतचा व्हीडीओ प्रसारीत झाला. आपल्या या कृत्यामुळे पोलीस विभागाची प्रतिमा जनमानसात मलीन झाली आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी या कार्यालयाचे पत्रा क्र. डिपी/३१-बी/प्रा.चौ/सपोउपनि-१४३८ सुधाकर जाधव/२०६४/२०२०, दि.१५/०२/२०२० अन्वये प्राथमीक चौकशी आदेशीत करण्यांत येवुन सदर प्राथमीक चौकशीत आपण स्वत:चा आर्थीक लाभ करुन घेण्यासाठी लोकसेवक वर्ग -३ या पदाचा दुरूपयोग करुन पोलीस खात्याची प्रतिमा जनमानसात मलीन केल्याचे सिध्द झाले आहे. पोलीस खात्यात असता आपण केलेल्या गैरवर्तना बाबत आपणास **मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपीले) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार "पुढिल देय वार्षिक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता स्थगीतीची " (अपरीणामकारक) शिक्षा का करण्यात येवु नय? तसेच दि.१६/०२/२०२० ते १५/०४/२०२० पर्यतचा निलंबन कालावधी जसाचे तसा (As Such) का करण्यात येवु नये?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदरची कादानो अपचारी यांनी दि. २५/०५/२०२० रोजी स्वीकारुन त्यावर दि.३०/०५/२०२० रोजी स्पष्टीकरण सादर केले. अंतीम आदेश निर्गमित करण्यापुर्वि अपचारी यांना दि.११/०६/२०२० रोजी त्यांचे मौखीक म्हणणे मांडणे करीता आज्ञांकीत कक्षात बोलविले असता त्यांचे मौखीक म्हणणे ऐकुण घेण्यात आले. स्पष्टीकरण व मौखिक म्हणने काही प्रमाणात समाधानकारक असल्याने प्रस्तावित शिक्षेत अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे अपचारी सपोउपनि/१४३८ सुधाकर जाधव नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ यांना उपरोक्त कसुरी प्रकरणी मुंबई पोलीस नियम (शिक्षा व अपिल) १९५६ मधील तरतुदिनुसार **" एक महिन्याचे मुळ वेतना ईतका आर्थिक दंड " देण्यात येत आहे. तसेच निलंबन कालावधी दि.१६/०२/२०२० ते १५/०४/२०२० पावेतोचा जसाचे तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

अपचारी हे जर सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते आदेश मिळाल्याचे दिनांका पासुन ६० दिवसाचे आत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**(एम. राज कुमार)**
**पोपलस अधिक्षक,यवतमाळ**

क्र.:डीपी/३१-बी -२ /यवत.ग्रा.बिट/अं.आ/ 4690 /२०२० यवतमाळ दिनांक 15 JUN 2020

## अंतीम आदेश

**कसूरदार :-** **१) पोहवा/७६ सुरेश झोटींग २) पोहवा/४९५ संतोष ढाकरगे**
**३) पोहवा/२९८ अशोक आंबिलकर , सर्व पो.स्टे.यवतमाळ ग्रामीण.**

**कसूरी :-**

आपण बिट अंमलदार म्हणुन पो.स्टे.यवतमाळ ग्रामीण अंतर्गत नेमणुकीस असतांना प्रत्येक महीन्यामध्ये प्रतिबंधक दारुबंदीच्या व जुगार तसेच म.पो.का. अन्वये केसेस करण्याचे टार्गेट लेखी देण्यात येते.परंतु दि.११/३/२०१८ रोजी झालेल्या गुन्हे सभेमध्ये म.पो.का.च्या ३० केसेस करण्याचे टार्गेट वरीष्ठांनी दिले.संपुर्ण महीन्यात वारंवार गणनेत सुचना देवुन सुध्दा आपण एकही केस उघडकीस आणलेले नाही.तसेच माहे मार्चमध्ये सुध्दा आपण एकही केस केलेली नाही.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेला हलगर्जीपणा व बेजबाबदारपणाचे कसुरी बाबत आपणांस क्र.डीपी / ३१ -बी/यवत.ग्रा.बिट कसुरी/९६२४/२०१८ यवतमाळ दि.२४/७/२०१८ नुसार **' एक वर्ष वेतनवाढ स्थगिती ' (परीणामकारक )** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी ही एक संधी देवुन व शिक्षा कमी करुन प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे **१) पोहवा/७६ सुरेश झोटींग २) पोहवा/४९५ संतोष ढाकरगे ३) पोहवा/२९८ अशोक आंबिलकर** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' रु.५०००/- ' आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज़ आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

**१) पोहवा/७६ सुरेश झोटींग २) पोहवा/४९५ संतोष ढाकरगे ३) पोहवा/२९८ अशोक आंबिलकर**
**मार्फत - ठाणेदार , पो.स्टे.यवतमाळ ग्रामीण.**

क्र.:डीपी/३१-बी -२ /मपोशि २११८ +०३ /अं.आ/ 4689 /२०२० यवतमाळ दिनांक 15 JUN 2020

## अंतीम आदेश

कसूरदार :- १) मपोशि/२११८ शितल (कळंब ) २) पोका/२३१६ ससनकर (मो.प.वि.यवतमाळ)
३) पोशि/२६२ रुपेश (वणी ) ४) पोहेका/१५०१ रामटेके (दारव्हा )

| अ. क्र | कसुरदार पो.कर्मचारी नाव | पो.स्टे. नाव | गैरहजर पो.नि.कक्ष नोंद दिनांक | प्रस्तावित शिक्षा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | मपोशि/२११८ शितल | कळंब | दि. २८/९/२०१९ चे ८.०० वा.पासुन ते दि.२९/९/२०१९ चे ८.०० वा. पावेतो दरम्यान पोनि/सायरे यांनी जिल्हा गस्त दरम्यान आपण गैरहजर मिळुन आले. गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष साना.क्र.२/१९ वेळ ०१.३० प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.१०००/- आ.दंड |
| 2 | पोका/२३१६ ससनकर | मोटर.परी .वि. | दि. १९/१०/२०१९ चे ८.०० वा.पासुन ते दि.२०/१०/२०१९ चे ८.०० वा. पावेतो दरम्यान आपली सेक्टर पेट्रोलिंग डयुटी लागली असता आपण डयुटीवरुन गैरहजर. गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष अनु.क्र.२ वेळ ००.०५ प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.१०००/- आ.दंड |
| 3 | पोशि/२६२ रुपेश | वणी | दि. २४/१०/२०१९ चे ८.०० वा.पासुन ते दि.२५/१०/२०१९ चे ८.०० वा. पावेतो दरम्यान मतमोजणी बंदोबस्त डयुटीवरुन गैरहजर. गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष अनु.क्र.१३ वेळ ८.२५ प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.१०००/- आ.दंड |
| 4 | पोहेका/१५०१ रामटेके | दारव्हा | दि. २४/१०/२०१९ चे ८.०० वा.पासुन ते दि.२५/१०/२०१९ चे ८.०० वा. पावेतो दरम्यान गणनेमध्ये पोउपनि/धरती काळे +२४ हजर होते.परंतु आपण गैरहजर. गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष अनु.क्र.४३ वेळ २०.१० प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.१०००/- आ.दंड |

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेल्या कसुरीबाबत आपणांस क्र. डीपी / 31 -बी -2 / पो.नि.कक्ष /मपोशि 03 मेघा +15/कसुरी/12711/2019 यवतमाळ दि.13/11/2019 नुसार आपणास स्तंभ क्र.5 नुसार प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर

केले नाही. तरी प्रस्तावित का.दा.नो. मधील शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे १) मपोशि/२११८ शितल २) पोका/२३१६ ससनकर ३) पोशि/२६२ रुपेश ४) पोहेका/१५०१ रामटेके यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' रु.1000/- '** आर्थिक दंड ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

प्रति,

१) मपोशि/२११८ शितल मार्फत - ठाणेदार,पो.स्टे.कळंब
२) पोका/२३१६ ससनकर मार्फत - ठाणेदार,पो.स्टे.मो.प.वि.यवतमाळ
३) पोशि/२६२ रुपेश मार्फत - ठाणेदार,पो.स्टे.वणी
४) पोहेका/१५०१ रामटेके मार्फत - ठाणेदार,पो.स्टे.दारव्हा

2) सदर आदेशाची मूळ प्रत संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची नावानिशी दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- वेतन लिपीक -1/ आस्थापना लिपीक/सआलि - 1,3,5 / डीपीजी लिपीक/ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

क्र.:डीपी/३१-बी -२ /नापोका ६०+०२/अं.आ/ 4693 /२०२० यवतमाळ दिनांक 15 JUN 2020

## अंतीम आदेश

कसूरदार :- १) नापोका/६० सलाम २) नापोका/१५६९ शैलेश जाधव
३) पोशि/२६३९ सुभान अलि , पो.स्टे.अवधुतवाडी

कसूरी :-

| अ. क्र | कसुरदार पो.कर्मचारी नाव | पो.स्टे. नाव | गैरहजर पो.नि.कक्ष नोंद दिनांक | प्रस्तावित शिक्षा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | नापोका/६० सलाम | अवधुत वाडी | दि. २७/९/२०१९ चे ८.०० वा.पासुन ते दि.२८/९/२०१९ चे ८.०० वा. पावेतो दरम्यान ७८ विधान सभा निवडणुक मतदार संघ यवतमाळ येथे फॉर्म भरणे डयुटी लागली असता आपण डयुटीवरुन गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष साना.क्र.१७/१९ वेळ ०९.३० प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.२०००/- आ.दंड |
| 2 | नापोका/१५६९ शैलेश जाधव | अवधुत वाडी | दि. २४/९/२०१९ चे ८.०० वा.पासुन ते दि.२५/९/२०१९ चे ८.०० वा. पावेतो दरम्यान आर्णी रोड वर पायदळ पेट्रालिंग डयुटी नेमली असता आपण कोणतीही पुर्व परवानगी न देता गैरहजर.गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष साना.क्र.४५/१९ वेळ २१.०० प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.५००/- आ.दंड |
| 3 | पोशि/२६३९ सुभान अलि | अवधुत वाडी | दि. १०/१०/२०१९ चे ८.०० वा.पासुन ते दि.११/१०/२०१९ चे ८.०० वा. पावेतो मा.एस.डी.पी.ओ. तोटावार साहेब यांनी रात्र गस्त दरम्यान मालेगाव पो.स्टे.चेक केले असता आपण गैरहजर .गैरहजर असल्याची नोंद पो.नि.कक्ष साना.क्र.११/१९ वेळ १९.०५ प्रमाणे घेण्यात आली आहे. | रु.५००/- आ.दंड |

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात केलेल्या कसुरीबाबत आपणांस क्र. डीपी / 31 -बी -2 / पो.नि.कक्ष /1947+16/कसुरी/13279/2019 यवतमाळ दि.25/11/2019 नुसार आपणास स्तंभ क्र.5 नुसार प्रस्तावित

शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी प्रस्तावित का.दा.नो. मधील शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे १) **नापोका/६० सलाम** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत ' **रु.2000/- ' आर्थिक दंड** व २) **नापोका/१५६९ शैलेश जाधव ३) पोशि/२६३९ सुभान अलि** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **' रु.500/- ' आर्थिक दंड** ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन 60 दिवसांचे आंत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

१) नापोका/६० सलाम   २) नापोका/१५६९ शैलेश जाधव   ३) पोशि/२६३९ सुभान अलि ,

**मार्फत - ठाणेदार,पो.स्टे.अवधुतवाडी**

2) सदर आदेशाची मूळ प्रत संबंधितांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची नावानिशी दिनांकासह स्वाक्षरी घेवून दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- वेतन लिपीक -1/ आस्थापना लिपीक/सआलि - 1,3,5 / डीपीजी लिपीक/ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.